# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 11/12/2022 (रविवार) सायंकाळ

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. नरखेड – अंतर्गत सावरगाव येथे दिनांक १०/१२/२०२२ चे ०९.३० वा. चे सुमारास पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत फिर्यादी यांची मुलगी वय १७ वर्ष ११ महिने ही शिकत होती. हिचे त्यांच्या गावातीलच मुलगा संशयित आरोपी नामे– दुर्गेश बोरीवार रा. सावरगाव याचेशी काही दिवसांपासुन प्रेमप्रकरण सुरू होते फिर्यादी यांनी समजावुन सांगितले व हटकले असता त्यांनी ऐकले नाही, वरील घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी रात्री ०९.३० वा. जेवण करून हॉलमध्ये सर्वांसोबत झोपी गेली असता दि. ११/१२/२०२२ रोजी पहाटे ०४.०० वा. दिसली नाही. फिर्यादी यांनी नातेवाइकांकडे व आजुबाजुला तसेच तिच्या मैत्रीणींना विचारले असता मिळुन आली नाही. आरोपी याने फिर्यादीचे मुलीला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बोथले पोलीस स्टेशन नरखेड मो. नं. ९८९०३७५३९६ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा पिपळा (बखारी) येथे दिनांक ११/१२/२०२२ चे ०६.००वा. ते ०६:१५ वा. दरम्यान यातील **मृतक नामे–परसरामजी लक्ष्मण भोयर वय ६५ वर्ष रा. पिपळा** याने डाव्या पायाला तळपायाला असलेल्या टिकेच्या त्रासाला कंटाळुन आपल्या राहते घरी कोणतेतरी विषारी औषध प्राशन करून त्यास उपचाराकरिता गामिण रूग्णालय पारशिवनी येथे आणले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मुरलीधर परसरामजी भोयर, वय ३५ वर्ष, रा. पिपळा (बखारी) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १४९० रविन्द्र चौधरी मो. क्र. ८८३०५६५०७६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर